# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
ई-मेल- *jtdirrom@gmail.com* *website – www.jdteromumbai.com*

परिपत्रक
**तात्काळ**

क्र. २/विकामुं/तंशि/इबीसी/२०१८/ 1832

दिनांक : 07 JUN 2018

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय, अशासकीय विनाअनुदानीत,
खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित
एमबीए, एमसीए, वास्तुशास्त्र, अभियांत्रिकी पदवी/पदविका,
औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका महाविद्यालये.

विषय : अधिप्रमाणित न झालेल्या आधार कार्ड बाबत (Regarding Unauthenticated Adhaar Card)
संदर्भ : तंत्रशिक्षण संचालनालयाच्या ईबीसी पोर्टलवर दि. ०१/०६/२०१८ पासून दिलेली लिंक

सर्व शासकीय (शासकीय अभिमत विद्यापीठांसह), अशासकीय अनुदानीत व खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित (खाजगी अभिमत/स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे वगळून) एमबीए, एमसीए, वास्तुशास्त्र, अभियांत्रिकी पदवी/पदविका, औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रवेशित आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी ५० टक्के शिक्षण शुल्क प्रतिपूर्तीकरिता ऑनलाईन अर्ज भरलेले होते. सदर अर्जांमध्ये विद्यार्थ्यांनी आधार तपशिल भरलेला होता. अचूक आधार तपशिलानुसार विद्यार्थ्यांचे आधार तपशिल अधिप्रमाणित होऊन त्यांच्या आधारशी लिंक असलेल्या बँक खात्यांवर त्यांच्या शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीची रक्कम जमा होणार होती. परंतु काही विद्यार्थ्यांचा आधार तपशिल चूकीचा भरला गेल्यामुळे त्यांचा आधार तपशिल अधिप्रमाणित (authenticated) झालेला नाही. त्यामुळे अशा आधार तपशिलाची यादी संस्थांना या आधीच ईबीसी पोर्टलवरील मेसेज बॉक्सद्वारे पाठविण्यांत आलेली आहे. तसेच काही संस्थांना त्यांच्या लॉगिन मध्येच विद्यार्थ्यांची यादी दिसत होती. अशा दोन्ही प्रकारच्या यादीमधील विद्यार्थ्यांचे आधार तपशिल संपादीत (edit) करण्याकरिता तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावरील ईबीसी पोर्टलवर आता आधार तपशिल अचूक नमूद करुन घेण्याकरिता लिंक उपलब्ध करुन देण्यांत आली आहे. तरी संस्थांनी तात्काळ संबंधीत विद्यार्थ्यांचा आधर तपशिल अचूकरित्या सदर लिंकद्वारे अद्यावत करायचा आहे. सदर लिंक अत्यंत अल्प कालावधीकरिता उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सर्व संबंधीत संस्थांनी तात्काळ आधार तपशिल अधिप्रमाणित (unauthenticated students) न झालेल्या विद्यार्थ्यांचा आधार तपशिल तात्काळ संपादीत करुन घ्यावा.

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई
यांचेकरिता